**<u>ठळक बातम्या</u>**

- AI च्या मदतीनं अन्न सुरक्षा, हवामान बदल या आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता वाढवण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

- जागतिक कृषी क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद आणि गुंतवणूकदार शिखर संमेलन येत्या २२ आणि २३ तारखेला मुंबईत होणार

- राज्य शिक्षण मंडळाची इयत्ता १०वीची परीक्षा सुरु

- भिवंडी- निजामपूर महानगरपालिकेच्या महापौरपदी भाजपा बंडखोर नारायण चौधरी यांची निवड

- टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत उद्यापासून सुपर एटमधल्या लढती

**आणि**

- महिला क्रिकेटमधे, भारत आशिया चषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत दाखल

**<><><><><>**

कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धीमत्तेच्या म्हणजेच AI च्या सहाय्याने अन्न सुरक्षितता, वातावरणातील बदलाला सामोरे जाण्याची क्षमता, महिला सक्षमीकरणासह सर्वांगीण समृध्दी आणण्यासाठी सरकार प्रयत्नशील  असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत भारत मंडपम् इथं इंडिया एआय इम्पॅक्ट समिट - २०२६ मधे 'एआय इन ॲग्रीकल्चर' या विषयावरच्या चर्चासत्रात ते बोलत होते.

सध्या जगभरात शेतीसमोर अनेक आव्हानं आहेत. त्यामुळे अन्न सुरक्षेवर ताण आला आहे.  अशा परिस्थितीत AI महत्त्वाची भूमिका बजावू शकते, असं मत मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केलं. राज्य सरकारनं महाॲग्री एआय धोरणाअंतर्गत विकसित केलेल्या मोबाईल मंचावर शेतकऱ्यांना व्यक्तिगतरित्या सल्ला उपलब्ध

आहे. त्याला शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद असल्याचं ते म्हणाले. या सत्रानंतर वार्ताहरांशी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले,

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस**

महाविस्तार ॲप ला शेतकऱ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळत असून, यामध्ये आणखी वाढ होईल अशी अपेक्षा मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली. ते म्हणाले,

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस**

या परिषदेच्या अनुषंगाने मुख्यमंत्र्यांनी जागतिक बँकेचे दक्षिण आशिया विभागाचे उपाध्यक्ष योहानिस त्सुट यांच्याशी चर्चा केली. यावेळी कृषी क्षेत्रात डिजिटल आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित सेवा मजबूत करणं, रोजगारनिर्मिती वाढवणं आणि तरुणांना शाश्वत रोजगारासाठी आवश्यक डिजिटल कौशल्यांचं प्रशिक्षण, या मुद्द्यांवर चर्चा झाली.

**<><><><><>**

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून राज्यातल्या शेतकऱ्यांना जागतिक तंत्रज्ञानाची माहिती व्हावी आणि नवीन तंत्रज्ञानाचा वापर शेतीत व्हावा या उद्देशाने जागतिक कृषी क्षेत्रातली कृत्रिम बुद्धिमत्ता परिषद आणि गुंतवणूकदारांचं शिखर संमेलन येत्या रविवारपासून मुंबईत आयोजित करण्यात आली आहे. राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज ही माहिती दिली. दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेत कृषी क्षेत्रातले जागतिक तज्ज्ञ, कृषी आणि कृषीसंलग्न क्षेत्रातले नवे स्टार्टअप, गुंतवणूकदार, वित्तीय संस्था सहभागी होणार आहेत.

**<><><><><>**

कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात अमेरिकेच्या नेतृत्वाखाली होत असलेला आंतरराष्ट्रीय करार पॅक्स सिलिकाचं सदस्यत्व भारतानं स्वीकारलं आहे. एआय इम्पॅक्ट परिषदेत या कारारवर स्वाक्षऱ्या झाल्या. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव आणि

अमेरिकेचे भारतातले राजदूत सर्जियो गोर यावेळी उपस्थित होते. भारत अमेरिका व्यापार कराराच्या पार्श्वभूमीवर भारतानं हे पाऊल उचलणं महत्त्वाचं मानलं जात आहे. आर्थिक आणि तंत्रज्ञान विषयक सहकार्य आणि पुरवठा साखळीला आधार यादृष्टीनं हा करार महत्त्वाचा आहे.

**<><><><><>**

राज्य शिक्षण मंडळाच्या १० च्या परीक्षेला आज सुरुवात झाली. ९ विभागीय मंडळांमधून मिळून १६ लाख १५ हजार ४८९ विद्यार्थी या परीक्षेला बसले आहेत. राज्यभरात एकूण ५ हजार १११ केंद्र असून कॉपीसह इतर गैरप्रकार रोखण्याकरता विशेष व्यवस्था केली आहे. पोलीस दलाची भरारी पथकं तैनात असून ड्रोनमार्फतही परीक्षा केंद्रावर लक्ष ठेवलं जात आहे.

दरम्यान, मंडळानं संकेतस्थळावर जाहीर केलेलं अधिकृत वेळापत्रकच ग्राह्य धरावं, असं आवाहन राज्य शिक्षण मंडळानं केलं आहे. परीक्षा १८ मार्चपर्यंत चालेल.

**<><><><><>**

भिवंडी निजामपूर महानगरपालिकेचे महापौर म्हणून भाजपातून फुटून बाहेर पडलेले नारायण चौधरी यांची निवड झाली आहे. उपमहापौर पदी काँग्रेसचे तारिक मोमीन यांची निवड झाली आहे.

काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि भाजपातून बाहेर पडलेले ९ नगरसेवक यांनी एकत्र येऊन भिवंडी सेक्युलर आघाडी स्थापन केली होती.

**<><><><><>**

टी ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत सुपर एट गटाचे सामने उद्यापासून सुरु होतील. पहिला सामना पाकिस्तान आणि न्यूझीलंड यांच्यात होणार आहे. कोलंबो इथं संध्याकाळी ७ वाजता हा सामना सुरु होईल.

भारत, वेस्ट इंडीज, दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, श्रीलंका, न्यूझीलंड, झिंबाब्वे, आणि पाकिस्तान हे देश सुपर एटमधे पोहोचले आहेत. भारताचा सामना येत्या

रविवारी, दक्षिण आफ्रिकेबरोबर अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडीयमवर होणार आहे.

सुपर एट फेरीत न पोहोचलेले ऑस्ट्रेलिया आणि ओमान यांच्यातला सामना आज श्रीलंकेत पल्लिकल इथं होत आहे. ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमधे, भारतानं आशिया चषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात स्थान मिळवलं आहे. आज बँकॉक इथं झालेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात भारतानं श्रीलंकेवर ५ गडी राखून दणदणित विजय मिळवला.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीला उतरलेल्या श्रीलंकेचा डाव २ चेंडू बाकी असतानाच ११८ धावात आटोपला. भारतातर्फे कर्णधार राधा यादवनं ४, तर तनुजा कंवर आणि प्रेमा रावत यांनी प्रत्येकी २ बळी मिळवले. त्यानंतर भारतानं ११९ धावांचं विजयी लक्ष्य ५ गड्यांच्या मोबदल्यात १४ व्या षटकातच पूर्ण केलं.

राधा यादवनं नाबाद ३१ धावा करत फलंदाजीतही मोलाचं योगदान दिलं. ती सामन्यातली सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरली.

**<><><><><>**

देशातल्या सर्व महामार्गांवरच्या टोल नाक्यांवर रोखीनं टोल घेण्याची पद्धत बंद करण्याचा सरकारचा विचार आहे. येत्या १ एप्रिलपासून फास्टॅग आणि युपीआय सारख्या डिजिटल माध्यमातूनच टोल स्वीकारला जाईल असं राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने म्हटलं आहे. टोल नाक्यांवरची गर्दी कमी करणं, टोलवसुलीत पारदर्शकता, आणि वाहनचालकांचा वेळ वाचावा यादृष्टीने हा बदल फायदेशीर ठरेल असं प्राधिकरणानं म्हटलं आहे. देशातल्या सर्व अकराशेपन्नास टोलनाक्यांवर हा नियम लागू होईल.

**<><><><><>**

भारत आणि अमेरिका यांच्यातल्या व्यापार करारावर मार्चमध्ये स्वाक्षरी होण्याची शक्यता असून येत्या एप्रिलपासून तो लागू होईल, असं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी आज सांगितलं. भारताचे ब्रिटन आणि ओमानबरोबरचे मुक्त व्यापार करारही एप्रिलपासूनच लागू होण्याची शक्यता गोयल यांनी व्यक्त केली आहे. न्यूझीलंडबरोबरचा करार सप्टेंबरमध्ये लागू होईल.

भारत-अमेरिका कराराच्या मसुद्याला अंतिम स्वरुप देण्यासाठी दोन्ही देशांच्या अधिकाऱ्यांमध्ये येत्या सोमवारी अमेरिकेत बैठक होणार आहे. व्हेनेझुएलाकडून तेल खरेदी करणं व्यावसायिक दृष्ट्या व्यवहार्य ठरणार असेल तर ते खरेदी करण्याचा विचार भारत करेल, असं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी या संदर्भातल्या वार्ताहर परिषदेत सांगितलं.

**<><><><><>**

स्पर्धात्मक युगात टिकून राहण्यासाठी शालेय शिक्षणात तंत्रज्ञान आणि ई-शिक्षण साधनांचा वापर आवश्यक असल्याचं प्रतिपादन शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी आज केलं. नाशिक जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांना आज भुसे यांच्या हस्ते दूरचित्रवाणी संचाचं वाटप करण्यात आलं. त्यावेळी ते बोलत होते. कत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल युगाच्या काळात नवीन तंत्रज्ञानाच्या मदतीनेच मुलांना शिक्षण घेणं सोपं होईल, असं भुसे म्हणाले.

**<><><><><>**

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध संघाने दूध खरेदीदरात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार दूध उत्पादकांना म्हशीच्या दुधाला साडे बावन्न ऐवजी साडेत्रेपन्न रुपये प्रतिलीटर मोबदला मिळेल, तर गायीच्या दुधाला ३४ रुपये ऐवजी ३६ रुपये प्रतिलीटर मोबदला मिळेल. दूधसंघाच्या आज कोल्हापूरमधे झालेल्या बैठकीत हा निर्णय झाल्याचं प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे. सुधारित दर उद्यापासून लागू होतील.

**<><><><><>**

गेल्या २४ तासात उत्तर मध्य महाराष्ट्रात किमान तापमानात लक्षणीय वाढ, तर उत्तर कोकण, दक्षिण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात किंचित वाढ झाली.

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

//<><><><><>//